पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे - १७

ड प्रभाग समिती,

कार्यपत्रिका क्र.३

सभावृत्तांत

दिनांक ०४/०७/२०१४ वेळ दुपारी ११.४५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची माहे जुलै २०१४ ची मासिक सभा शुक्रवार दि. ०४/०७/२०१४ रोजी दुपारी १२.०० वाजता ड क्षेत्रिय कार्यालयाच्या छत्रपती शाहू महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. सदर सभेस पुढीलप्रमाणे सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. मा. श्रीमती आरती चोंधे | अध्यक्ष, |
| २. मा. श्री. नांदगुडे विलास एकनाथ | सदस्य |
| ३. मा.श्री. चाबुकस्वार गौतम सुखदेव | सदस्य |

याशिवाय मा.पी.एच.झुरे, प्रभाग अधिकारी, मा.मनोज लोणकर, प्रशासन अधिकारी, सचिव,सभा शाखा, मा.गुलाब दांगट, कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा. चव्हाण एस.एस. कार्यकारी अभियंता विदयुत मा. रत्नपारखी, उपअभियंता स्थापत्य,मा.रविंद्र पवार, उपअभियंता जलनिसारण विभाग, मा.व्ही.के. बेंडाळे, सहा. आरोग्याधिकारी इत्यादी अधिकारी उपस्थित होते.

सभेच्या सुरुवातीस मा.अध्यक्ष यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात केली. तदनंतर मा. श्री.चाबुकस्वार गौतम सुखदेव , सदस्य यांनी पुढीलप्रमाणे सुचना मांडली.

आज दिनांक ४/७/२०१४ रोजीची सभा गणसंख्या अभावी तहकुब करणेत यावी व सदरची तहकुब सभा दिनांक १४/०७ /२०१४ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित करणेत यावी.

सदर सुचनेस मा. श्री. विलास एकनाथ नांदगुडे , सदस्य यांनी अनुमोदन दिले.

तदनंतर मा.अध्यक्ष यांनी आज दिनांक ०४/०७/२०१४ रोजीची प्रभाग समितीची सभा दिनांक १४/०७/२०१४ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत तहकुब करणेत येत असल्याचे प्रकट केले.

Aarttee

(आरती चोंधे)
**सभापती**
ड प्रभाग समिती पिं.चिं.म.न.पा.,
रहाटणी ४११०१७

क्रमांक – ड/१३/कावि/५६ /२०१४
दिनांक – ०७/०७/२०१४

**प्रशासन अधिकारी तथा**
सचिव (सभाशाखा)
ड प्रभाग समिती

clear T/c

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे – १७

ड प्रभाग समिती समिती,

कार्यपत्रिका क्र.४

सभावृत्तांत

दिनांक १४/०७/२०१४ वेळ दुपारी १२.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची माहे जुलै २०१४ ची मासिक तहकुब सभा शुक्रवार दि. १४/०७/२०१४ रोजी दुपारी १२.०० वाजता ड क्षेत्रिय कार्यालयाच्या छत्रपती शाहू महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. सदर सभेस पुढीलप्रमाणे सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. मा. श्रीमती आरती चोंधे | अध्यक्ष, |
| २. मा. श्री. कैलासभाऊ गबाजी थोपटे | सदस्य |
| ३. मा.श्री. रामदास गेणभाऊ बोकड | सदस्य |
| ४. मा.श्रीम. विमल रमेश काळे | सदस्य |
| ५. मा. श्री. बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे | सदस्य |
| ६. मा. श्रीम. वैशाली राहुल जवळकर | सदस्य |
| ७. मा. श्री. गौतम सुखदेव चाबुकस्वार | सदस्य |
| ८.मा. श्रीम. सुनिता राजेश वाघेरे | सदस्य |
| ९.मा. श्री. प्रभाकर नामदेव वाघेरे | सदस्य |
| १०.मा. श्रीम. उषा संजोग वाघेरे (पाटील) | सदस्य |
| ११.मा. श्री. प्रमोद रघुनाथ ताम्हणकर | सदस्य |
| १२. मा. श्रीमती निता विलास पाडळे | सदस्य |
| १३.मा. श्रीमती अनिता मच्छिंद्र तापकीर | सदस्य |
| १४.मा. श्री. विलास एकनाथ नांदगुडे | सदस्य |
| १५.मा. श्रीमती. शितल विठ्ठल उर्फ नाना काटे | सदस्य |
| १६.मा. श्रीमती शकुंतला भाऊसाहेब धराडे | सदस्य |
| १७.मा. श्री. राजेंद्र गणपत जगताप | सदस्य |

याशिवाय मा.पी.एच.झुरे, प्रभाग अधिकारी, मा.मनोज लोणकर, प्रशासन अधिकारी, तथा सचिव,सभा शाखा, मा.गुलाब दांगट, कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा. देशमुख उपअभियंता विदयुत मा. रत्नपारखी, मा. सोनवणे, मा. ओहोळ, उपअभियंता स्थापत्य,मा.रविंद्र पवार, उपअभियंता जलनिसारण विभाग, मा. फारुक शेख, उपअभियंता पाणीपुरवठा विभाग, मा.व्ही.के. बेंडाळे, सहा. आरोग्याधिकारी इत्यादी अधिकारी उपस्थित होते.

सभेच्या सुरुवातीस मा.अध्यक्ष यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात केली.

सद्यस्थितीत पिंपरी चिंचवड परिसरात पाऊस नसल्याने पाण्याची टंचाई झाली असुन एकाच वेळेस सर्व परिसरात पाणी पुरवठा होत असुन काही ठिकाणी दोन दिवस पाणी पुरवठा होत नसलेने सर्व सदस्यांनी नाराजी व्यक्त केली.

**श्री. राजेंद्र जगताप**:- ज्या ठिकाणी खाजगी मालकीच्या बोअर वेल्स आहेत त्यांचेवर मोटर बसवुन वापरणेत येत आहेत असे निदर्शनास आणुन दिले तसेच काही विहीरी आहेत त्या विहीरींवर मोटर बसवुन टँकर्सद्वारे पाणी पुरवठा करणे शक्य आहे परंतु सध्या मनपा मार्फत टँकर्सद्वारे पाणी पुरवठा करणे बंद आहे. ब-याच सार्वजनिक नळांवर मोटर बसविण्यात आलेली आहे.

**श्रीमती पाडळे**:- सरकारी नळांवर मोटर लावणेत येत असलेने काही ठिकाणी पाणी मिळत असुन काही ठिकाणी पाण्याची टंचाई भेडसावत आहे.

**श्री. थोपटे कैलासभाऊ:-** पाण्याचे नियोजनाबाबत वेळोवेळी कार्यवाही होणे आहे. पाणी गळती किंवा पाणी चोरीबाबत वेगळे स्क्वॉड नेमणे आवश्यक आहे.

**श्रीमती पाडळे व श्री. कैलासभाऊ थोपटे:-** अनधिकृत नळकनेक्शन तोडण्याची कार्यवाही होणे आवश्यक आहे.

**श्रीमती धराडे व श्री.रामदास बोकड:-** आतापर्यंत ब-याच वेळा पूर्वीच्या पाण्याच्या पाईपलाईन बदलणेबाबत संबंधित अधिका-यांना सूचना केलेल्या असुन अद्याप पर्यंत काहीही कार्यवाही झालेली नाही. दिवसेंदिवस परिसरातील लोकसंख्या वाढत असुन पूर्वीच्या पाईपलाईन्स बदलणे गरजेचे आहे.

**श्री. फारुक शेख, उपअभियंता पाणीपुरवठा:-** सध्या त्यांचे कार्यक्षेत्रातील पाण्याचे नवीन पाईपलाईनचे कामाबाबत निविदा प्रक्रिया सुरु आहे.

**श्री. बोकड रामदास :-** नळकोंडाळयांचा गैरवापर होत असल्याने नळकोंडाळे बंद करण्यात यावेत.

**श्री. शत्रुघ्न काटे :-** सध्या पाणी पुरवठयाचा प्रश्न गंभीर असुन पाणीगळती कमी झाली पाहिजे व याकामी नागरीकांमध्ये जागरुकता येण्याच्या दृष्टीने नागरीकांना आवाहन करण्यात यावे.

**श्री. कैलासभाऊ थोपटे** :- तानाजीनगर येथील झोपडपट्टी निष्कासित झाली आहे परंतु तेथील नळजोड अद्याप बंद करण्यात आलेला नाही.

**उपअभियंता पाणीपुरवठा श्री. शेख :-** सदर ठिकाणचे नळजोड बंद करण्यात आले आहेत .

**श्री. कैलासभाऊ थोपटे** :- अद्याप तीन ठिकाणी नळजोड चालू आहेत .

**उपअभियंता, पाणीपुरवठा श्री. शेख** :- पाहणी करुन तात्काळ कार्यवाही करण्यात येईल.

**मा. अध्यक्षा, ड प्रभाग समिती**:- नागरीकांच्या तक्रारींकडे गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे. तसेच त्यांनी ड प्रभाग समिती परिसरातील भिंतींवर पाणीपुरवठा, आरोग्य व पर्यावरण विषयक घोषवाक्ये लिहिणेबाबत सूचना मांडली.

**श्री. कैलासभाऊ थोपटे** :- प्रभागामध्ये किती रिक्षा आहेत, माझे वॉर्डामध्ये केवळ २ रिक्षा असुन कचरा उचलला जात नाही. औषध फवारणी केली जात नाही.

**श्री. बेंडाळे सहा. आरोग्य अधिकारी**:- प्रभागामध्ये एकुण ३७ रिक्षा व एक ट्रक आहे. त्यापैकी वॉर्ड क्र. ४८ मध्ये आज रोजी ०५ रिक्षा कार्यरत आहेत. औषधांचा साठा उपलब्ध झालेला असुन नियमित औषध फवारणी करण्यात येत आहे.

**श्री. विलास नांदगुडे:-** सर्व्हे क्र. ४२ येथे कारवाई करण्यात येणार होती परंतु अद्याप कारवाई झाली नाही. सदर ठिकाणी वाहतुकीची कोंडी होत असलेने लवकरात लवकर पोलीस बंदोबस्त उपलब्ध करुन कारवाई करण्यात यावी.

**श्री. दांगट, कार्यकारी अभियंता,स्थापत्य** :- सदर ठिकाणाबाबत न्यायालयाचा निर्णय प्रलंबित असल्याने मे. न्यायालयाचा निर्णय होताच तात्काळ कार्यवाही करण्यात येईल. याबाबत कायदा विभागाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे.

**श्री. कैलासभाऊ थोपटे व श्रीमती अनिता तापकीर** :- तापकीरनगर भागात रस्त्यांवर खड्डयांचे प्रमाण खुप असुन दुरुस्तीबाबत तात्काळ कार्यवाही करावी.

**श्री. रामदास बोकड:-** प्रभाग क्र. ५६ मध्ये नवीन मंगल कार्यालयाचे काम सुरु आहे, त्याचे बांधकामाबाबत काहीही कारवाई स्थापत्य विभागाकडून होत नाही.

**श्री. दांगट, कार्यकारी अभियंता स्थापत्य:-** प्रत्यक्ष पाहणी वरुन मंगल कार्यालयाचे काम सुरु असल्याचे दिसुन येत नाही व सीमाभिंतीबाबत संबंधितांना नोटीस देण्यात आलेली आहे.

पशुवैद्यकीय विभागाकडील तक्रारींचे प्रमाण पाहता सर्व सदस्यांनी पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. गोरे यांनी या पुढे प्रभाग समिती बैठकीस उपस्थित राहणेबाबत मागणी केली.

बैठकीचे शेवटी श्रीमती पाडळे यांनी मा. श्री. पी. एच. झुरे, क्षेत्रिय अधिकारी ड क्षेत्रीय कार्यालय हे दिनांक ३१/७/२०१४ रोजी नियत वयोमानानुसार मनपा सेवेतुन सेवानिवृत्त

होत असलेने प्रभाग समितीचे सदस्यांचे वतीने त्यांना पुष्पगुच्छ देऊन व सेवानिवृत्ती काळाबाबत शुभेच्छा देऊन सत्कार करणेबाबत सूचना केली.

सदर सूचनेस श्रीमती सुनिता वाघेरे सदस्या यांनी अनुमोदन दिले.

तदनंतर मा.अध्यक्ष यांनी दिनांक०४/०७/२०१४ रोजीचे प्रभाग समिती सभेचे कार्यपत्रिकेवर कोणताही विषय नसलेने सभा संपलेचे जाहीर केले.

Aarttee

(आरती चोंधे)
**सभापती**
ड प्रभाग समिती पिं.चिं.म.न.पा.,
रहाटणी ४११०१७

**प्रशासन अधिकारी तथा**
सचिव (सभाशाखा)
ड प्रभाग समिती

क्रमांक – ड/१३/कावि/८२/२०१४
दिनांक – २७/०७/२०१४

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे - १७

ड प्रभाग समिती,

कार्यपत्रिका क्र.३

सभावृत्तांत

दिनांक ०६/०६/२०१४ वेळ दुपारी १२.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची माहे जुन २०१४ ची मासिक सभा शुक्रवार दि. ०६/०६/२०१४ रोजी दुपारी १२.०० वाजता ड क्षेत्रिय कार्यालयाच्या छत्रपती शाहू महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. सदर सभेस पुढीलप्रमाणे सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. मा. श्रीमती आरती चोंधे | अध्यक्ष, |
| २. मा. श्री. कैलासभाऊ गबाजी थोपटे | सदस्य |
| ३. मा.श्री. रामदास गेणभाऊ बोकड | सदस्य |
| ४. मा.श्रीम. विमल काळे | सदस्य |
| ५. मा. श्री. बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे | सदस्य |
| ६. मा. श्रीम. जवळकर वैशाली राहुल | सदस्य |

याशिवाय मा.पी.एच.झुरे, प्रभाग अधिकारी, मा.मनोज लोणकर, प्रशासन अधिकारी, सचिव,सभा शाखा, मा.गुलाब दांगट, कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा. चव्हाण एस.एस. कार्यकारी अभियंता विदयुत मा. रत्नपारखी, उपअभियंता स्थापत्य,मा.रविंद्र पवार, उपअभियंता जलनिसारण विभाग, मा.व्ही.के. बेंडाळे, सहा. आरोग्याधिकारी इत्यादी अधिकारी उपस्थित होते.

सभेच्या सुरुवातीस मा.अध्यक्ष यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात केली. तदनंतर मा. श्री. कैलासभाऊ गबाजी थोपटे, सदस्य यांनी पुढीलप्रमाणे सुचना मांडली.

आज दिनांक ६/६/२०१४ रोजीची सभा मा. ग्राम विकास मंत्री कै.श्री.गोपीनाथजी मुंडे यांचे अपघाती निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली वाहुन तहकुब करणेत यावी व सदरची तहकुब सभा दिनांक ०४ /०७ /२०१४ रोजी सकाळी ११.४५ वाजता आयोजित करणेत यावी.

सदर सुचनेस मा. श्री. रामदास गेणभाऊ बोकड सदस्य यांनी अनुमोदन दिले.

तदनंतर मा.अध्यक्ष यांनी आज दिनांक ६/६/२०१४ रोजीची प्रभाग समितीची सभा दिनांक ०४/०७/२०१४ रोजी सकाळी ११.४५ वाजेपर्यंत तहकुब करणेत येत असल्याचे प्रकट केले.

Aarrttee

(आरती चोंधे)

**सभापती**

ड प्रभाग समिती पिं.चिं.म.न.पा.,

रहाटणी ४११०१७

क्रमांक – ड/१३/कावि/५५ /२०१४

दिनांक – ०७/०७/२०१४

**प्रशासन अधिकारी तथा**

सचिव (सभाशाखा)

ड प्रभाग समिती

Mom.doc

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे - १७

ड प्रभाग समिती,

कार्यपत्रिका क्र.३

सभावृत्तांत

दिनांक १४/०७/२०१४ वेळ सकाळी ११.४५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची माहे जुन २०१४ ची दि. ०६/०६/२०१४ रोजीची तहकुब सभा सोमवार दि. १४/०७/२०१४ रोजी दुपारी ११.४५ वाजता ड क्षेत्रिय कार्यालयाच्या छत्रपती शाहू महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. सदर सभेस पुढीलप्रमाणे सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. मा. श्रीमती आरती सुरेश चोंधे | अध्यक्ष, |
| २. मा. श्री. कैलासभाऊ गबाजी थोपटे | सदस्य |
| ३. मा.श्री. रामदास गेणभाऊ बोकड | सदस्य |
| ४. मा.श्रीम. विमल रमेश काळे | सदस्य |
| ५. मा. श्री. बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे | सदस्य |
| ६. मा. श्रीम. वैशाली राहुल जवळकर | सदस्य |
| ७. मा. श्री. गौतम सुखदेव चाबुकस्वार | सदस्य |
| ८.मा. श्रीम. सुनिता राजेश वाघेरे | सदस्य |
| ९.मा. श्री. प्रभाकर नामदेव वाघेरे | सदस्य |
| १०.मा. श्रीम. उषा संजोग वाघेरे (पाटील) | सदस्य |
| ११.मा. श्री. प्रमोद रघुनाथ ताम्हणकर | सदस्य |
| १२. मा. श्रीमती निता विलास पाडळे | सदस्य |
| १३.मा. श्रीमती अनिता मच्छिंद्र तापकीर | सदस्य |
| १४.मा. श्री. विलास एकनाथ नांदगुडे | सदस्य |
| १५.मा. श्रीमती. शितल विठ्ठल उर्फ नाना काटे | सदस्य |
| १६,मा. श्रीमती शकुंतला भाऊसाहेब धराडे | सदस्य |
| १७.मा. श्री. राजेंद्र गणपत जगताप | सदस्य |

याशिवाय मा.पी.एच.झुरे, प्रभाग अधिकारी, मा.मनोज लोणकर, प्रशासन अधिकारी, तथा सचिव,सभा शाखा, मा.गुलाब दांगट, कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा. देशमुख, उपअभियंता विदयुत मा. रत्नपारखी, मा. सोनवणे, मा. ओहोळ, उपअभियंता स्थापत्य,मा.रविंद्र पवार, उपअभियंता जलनिसारण विभाग, मा. फारुक शेख, उपअभियंता पाणीपुरवठा विभाग, मा.व्ही.के. बेंडाळे, सहा. आरोग्याधिकारी इत्यादी अधिकारी उपस्थित होते.

सभेच्या सुरुवातीस मा.अध्यक्ष यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात केली.

तदनंतर मा.अध्यक्ष यांनी दिनांक ०६/०६/२०१४ रोजीचे प्रभाग समिती सभेची कार्यपत्रिका क्र.३, दि. ७/३/२०१४ व दि. ९/५/२०१४, कार्यपत्रिका क्र.१ दि. २८/४/२०१४ तसेच कार्यपत्रिका क्र.२ दिनांक ९/५/२०१४ व दि. १९/५/२०१४ रोजीचे बैठकींचे सभावृत्तांत कायम करणेत येऊन बैठक संपलेचे जाहीर केले.

Aarttee

(आरती चोंधे)

**सभापती**

ड प्रभाग समिती पिं.चिं.म.न.पा.,

रहाटणी ४११०१७

क्रमांक – ड/१३/कावि/ /२०१४

दिनांक – /०७/२०१४

**प्रशासन अधिकारी तथा**

सचिव (सभाशाखा)

ड प्रभाग समिती